# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

क्रमांक-तक्रार-१२०/२०२५ दिनांक :- ०२ एप्रिल, २०२६

१. श्री. गणपत पंजाबराव चालखोर, वार्ड क्र. १, नेरी पो. व्याहाड-२३, ता. हिंगणा, जि. नागपूर -- **तक्रारदार**

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, गट ग्रामपंचायत नेरी, पंचायत समिती हिंगणा, जि. नागपूर -- **जन माहिती अधिकारी**

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती हिंगणा, जि. नागपूर -- **प्रथम अपिलीय अधिकारी**

तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १८ नुसार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं.) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दिनांक ११.०३.२०२५ अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. परंतु उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं.) जिल्हा परिषद नागपूर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ नुसार तक्रार स्विकारणे व त्यांची चौकशी करणे याबाबतचे अधिकार मा. राज्य माहिती आयोग यांना आहे. करीता सदर तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीकरीता दिनांक १३.०३.२०२५ अन्वये नागपूर आयोगाकडे हस्तांतरीत करुन सदर तक्रार अर्ज दिनांक २१.०४.२०२५ रोजी नागपूर आयोगास प्राप्त झालेला आहे. या तक्रार अर्जाचे अवलोकन केले असता तक्रारदार यांनी " जन माहिती अधिकारी, ग्रामपंचायत नेरी यांचेकडून कोणत्याही प्रकारे उत्तर मिळाले नाही" असे कारण नमूद करुन थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित झालेल्या अर्जदारास दाद मागण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९ (१) अन्वये ज्या कोणत्याही व्यक्तीला कलम ७ चे पोटकलम (१) किंवा पोटकलम (३) चा खंड (क) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत निर्णय प्राप्त झाला नसेल, किंवा यथस्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्या निर्णयाने जी व्यक्ती व्यथित झालेली असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अशी मुदत संपल्यापासून किंवा असा निर्णय प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांमधील यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अशा अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ च्या कलम १९(६) अन्वये पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये केलेले अपील, ते मिळाल्याच्या दिनांकापासून यथास्थिती तीस दिवसांच्या आत किंवा ते दाखल केल्याच्या दिनांकापासून एकूण पंचेचाळीस दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, कारणे लेखी नमूद करुन, निकालात काढण्यात येईल.

माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ च्या कलम १९(३) अन्वये पोटकलम (१) खालील निर्णया विरुध्दचे दुसरे अपील, ज्या दिनांकास निर्णय द्यायला हवा होता किंवा प्रत्यक्षात मिळाला होता त्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, केंद्रीय माहिती आयोगाकडे किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाखल करता येईल.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी Chief Information Commissioner -Vs- State of Manipur (AIR २०१२ SC ८६४), यामध्ये सिव्हिल अपील क्रमांक १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर, दिनांक १२.१२.२०११ रोजी दिलेल्या आदेशामध्ये – The nature of the power under Section १८ is supervisory in character whereas the procedure under Section १९ is an appellate procedure and a person who is aggrieved by refusal in receiving the information which he has sought for can only seek redress in the manner provided in the stature, namely, by following the procedure under Section १९. This Court is, therefore, of the opinion that Section ७ read with Section १९ provides a complete statutory mechanism to a person who is aggrieved by refusal to receive information. Such person has to get the information by following the aforesaid statutory provisions." असे स्पष्ट केले आहे.

मा. सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेले आदेश (Judgment) लक्षात घेता असे स्पष्ट होते की, केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ मधील तरतुदीनुसार केलेल्या तक्रारी ऐवजी कलम ६ अंतर्गत केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने व्यथीत झाल्यास, कलम १९ (१) नुसार प्रथम अपील व कलम १९(१) वरील निर्णय मान्य नसेल तर कलम १९(३) अन्वये व्दितीय अपील दाखल करणे क्रमप्राप्त ठरते.

तसेच ज्या माहिती अर्जाच्या संदर्भात कलम १९ (३) अन्वये आयोगास व्दितीय अपील सादर करण्यात आले आहे व ज्या अपील प्रकरणी आयोगाने पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, अशा प्रकरणी तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत तक्रार दाखल करणे अपेक्षित आहे.

तक्रारदार यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता आयोगास असे निदर्शनास आले आहे की, तक्रारदार यांनी माहिती अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम ६(१) अंतर्गत दिनांक १३.११.२०२४ रोजी संबंधित जन माहिती अधिकारी तथा सचिव, गट ग्रामपंचायत नेरी यांचेकडे माहितीचा अर्ज दाखल केला. त्यानंतर तक्रारदार यांनी "दि. १३.११.२०२४ च्या अर्जावर माहिती शुल्क भरुन सुध्दा माहिती न दिल्याबद्दल" असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती हिंगणा यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ मधील कलम १९(१) अन्वये प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १४.०१.२०२५ रोजी सुनावणी घेवून "(१) अपीलार्थी यांचे अर्ज अंशत: मान्य करण्यात येत आहे. (२) अपीलार्थी यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे. (३) जन माहिती अधिकारी, ग्रामपंचायत नेरी मानकर यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत जोडपत्र-अ मध्ये मागितलेली माहिती आदेश मिळाल्याच्या दिनाकांपासून १० दिवसाच्या आत अपिलार्थी यांना विनामुल्य् पोस्टाद्वारे देण्यात यावी तसेच अपिलार्थी यांनी माहिती करीता भरण्यात आलेली रक्कम विनाविलंब परत करण्यात यावे व तसा अहवाल प्रथम अपिलय अधिकारी यांना देण्यात यावी. (४)अपिलार्थी यांनी जोडपत्र-अ मध्ये नमूद संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी, ग्रामपंचायत नेरी मानकर यांचेकडून विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी" असे नमूद करुन आदेश पारीत केले. तद्नंतर तक्रारदार यांनी "जन माहिती अधिकारी, ग्रामपंचायत नेरी यांचेकडून कोणत्याही प्रकारे उत्तर मिळाले नाही" असे कारण नमूद करुन आयोगाकडे कलम १८ (१) अन्वये थेट तक्रार अर्ज दाखल केला आहे. यावरुन असे दिसून येते की, तक्रारदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी कलम १९ (३) अंतर्गत उपलब्ध असलेल्या संपूर्ण वैधानिक कार्यप्रणालीचा अवलंब न करता कलम १८ चा वापर केला आहे.

तक्रारदार यांची कलम १९(३) अंतर्गत कार्यप्रणालीचा अवलंब न करता अशा पध्दतीने तक्रार दाखल करण्याची कृती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार विसंगत ठरते.

तथापि, तक्रारकर्ता यांच्या दिनांक २१.०३.२०२५ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांना पत्र क्र. रामाआ/त.क्र. १२०/२०२५/तक्रार शाखा/२०८९, दिनांक ०६.०५.२०२५ अन्वये तक्रारदार यांच्या दिनांक १३.११.२०२४ रोजीच्या माहिती अर्जा संदर्भात व

दिनांक २७.१२.२०२४ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत नेरी (मानकर), पंचायत समिती हिंगणा यांनी दिनांक २८.०५.२०२५ च्या पत्रान्वये आयोगास अहवाल सादर करुन त्यामध्ये, “तक्रारदार श्री. गणपत पंजाबराव चालखोर यांनी ग्रामपंचायतला दाखल केलेला माहिती अर्ज दि. १३.११.२०२४ रोजी व दि. २७.१२.२०२४ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील नुसार प्रथम अपील निर्णय संदर्भ जा. क्र./पंसहि/मा/अ/१४८/२०२५ अन्वये श्री. गणपत पंजाबराव चालखोर यांना त्वरित तीन दिवसात माहितीच्या १०५ प्रती व धनादेश ३१० रु. ध. क्र. २१६७१९ स्पीड पोस्टाने दि. १७.०१.२०२५ जावक क्र. ६३ अन्वये पाठविण्यात आले. परंतु सदर माहिती श्री. गणपत चालखोर हे हजर नाही व घेण्यास नकार या कारणाने ग्रामपंचायतला दि. ०४.०२.२०२५ ला परत आले. त्यानंतर परत दि. १७.०२.२०२५ ला सदर संपूर्ण माहिती स्पिड पोस्टाने पाठविण्यात आली. तरी श्री. गणपत चालखोर यांनी माहिती घेण्यास नकार दिला व सदर माहिती दि. २५.०२.२०२५ ला ग्रामपंचायतला परत आलेली आहे. श्री. गणपत पंजाबराव चालखोर यांचा दि. २६.०८.२०२४ चा माहिती अधिकाराबाबत अर्ज नुसार नमुना २२, २३, २४ ची संपूर्ण माहिती दि. २०.०९.२०२४ ला जावक क्र. ३६ नुसार देण्यात आलेली आहे. तसेच त्यांनी हीच माहिती पुनश्च मागितलेली आहे तसेच त्यांना सदर माहिती पुनश्च देण्यात आली. परंतु त्यांनी घेण्यास नकार दिलेला आहे. तरी सदर अहवाल आपल्या माहितीस सविनय सादर.” असे नमुद केले आहे.

सबब, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जानुसार तक्रारकर्ता यांना स्पीड पोस्टाद्वारे माहिती पाठविली होती. परंतु तक्रारकर्ता यांनी सदर माहिती घेण्यास नकार दर्शविला असल्यामुळे दिनांक २०.०९.२०२४ नुसार माहिती देण्यात आली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता मा. सर्वोच्च न्यायालय यांनी सिव्हिल अपील क्र. १०७८७-१०७८८/२०११ या याचिकेवर दिलेले आदेशानुसार तसेच तक्रारकर्ता यांना माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती प्रदान केली असल्याने तक्रारदार यांनी कलम १८ अंतर्गत केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही. या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(गजानन निमदेव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण :** नागपूर
**दिनांक:** ०२.०४.२०२६

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

जा.क्र. २८४८ दि. 7 APR 2026

E:\SD \तक्रार शाखा\थेट तक्रारआदेश – चालखोर